# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
## विधान भवन, नागपूर - ४४०००१

## विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत ज्यूस सेंटर व्यवस्था करण्यासाठी
## दरपत्रक

सन २०२४ चे महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे सुरु होणार आहे. विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत ज्यूस सेंटर व्यवस्था करण्यासाठी ज्यूस सेंटर ठेकेदारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदर दरपत्रक मोहोरबंद (Seal Pack) पाकीटातून **"सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवाल, विधानभवन, मुंबई-४०० ०३२"** यांचे नावे दर्शवून **'कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, नागपूर ४४० ००१'** यांच्याकडे दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठवावी. प्राप्त दरपत्रकांपैकी कोणतेही दरपत्रक स्वीकृत अथवा अस्वीकृत करण्याचा अंतिम अधिकार सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी राखून ठेवला आहे याची नोंद घ्यावी. दरपत्रकासंदर्भातील नियम व अटी संबंधीत अधिक माहितीसाठी या सचिवालयाचे www.mls.org.in हे संकेतस्थळ पहावे.

**दिनांक :- ६ डिसेंबर, २०२४**

**विधान भवन,**
**नागपूर**

# विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत ज्यूस सेंटर व्यवस्था करण्यासाठी दरपत्रक

# नियम व अटी

सन २०२४ चे महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी अधिवेशन नागपूर येथे प्रस्तावित असून अधिवेशन कालावधीत मा.सदस्यांकरीता ज्यूस सेंटरची व्यवस्था करण्याकरीता नोंदणीकृत ज्यूस सेंटरकडून जाहिर दरपत्रक पद्धतीने दरपत्रके मागविण्यात येत असून त्याबाबतचे नियम व अटी खालीलप्रमाणे आहे.

(१) जिल्हा पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्तांकडून खाद्यपेय प्रबंधकांनी स्वत:च्या चारित्र्याविषयी, समाज विघातक प्रकरणात सहभागी नसल्याचे तसेच ते पोलीस विभागाकडे नोंदी असलेल्या आर्थिक अथवा कुठल्याही स्वरुपाच्या गंभीर गुन्ह्याची नोंद नसल्याचे अद्ययावत प्रमाणपत्र सादर करावे व ते प्राप्त करण्यास विलंब लागत असल्यास तुर्त यासंदर्भात स्वत:चे शपथपत्र (Affidavit) सादर करावे व प्रमाणपत्र तातडीने प्राप्त करुन घेऊन ते सादर करण्यात यावे. तसेच भागीदार असल्यास सर्व भागीदारांचे पोलीस पडताळणी प्रमाणपत्र अथवा शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२)दरपत्रक सादर करतांना दरपत्रदार महाराष्ट्र राज्याचा किमान १५ वर्षे रहिवाशी असल्याबाबतचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

(३) अन्न व औषधी द्रव्ये (FSSAD) प्रशासन विभागाकडून देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

(४) गुमास्ता परवाना कागदपत्रे

(५)पॅनकार्ड छायांकित प्रत तसेच गत तीन वर्षांचे Income Tax Return भरल्याची कागदपत्रे

(६) जी.एस.टी.नोंदणी क्रमांक आवश्यक

.. २/-

(७) दरपत्रक सोबतच्या "परिशिष्ट "अ" मधील दरसूचीमध्ये दिलेल्या तक्त्यात दर भरुन सादर करावेत.

(८) यशस्वी दरपत्रदारास रु.५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) अनामत रक्कम म्हणून डी.डी. च्या स्वरुपात "**कक्ष अधिकारी तथा आहरण व सवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय"** यांच्याकडे जमा करावी लागेल

(९) सदर दरपत्रक मोहोरबंद (Seal Pack) पाकीटातून **"कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, नागपूर"** यांच्याकडे दिनांक **११ डिसेंबर, २०२४** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत द्यावेत.

(१०) दरपत्रक स्वीकृत/अस्वीकृत करण्याबाबतचे सर्व अधिकार सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्याकडे असतील.

# परिशिष्ट "अ"

## दरपत्रकासोबत सादर करावयाची ज्यूसची सूची व दर

| अ.क्र. | ज्यूसचा प्रकार | मिली.लिटर | दर (रु.) |
|---|---|---|---|
| (१) | संत्रा ज्यूस | | |
| (२) | मोसंबी ज्यूस | | |
| (३) | पायनॅपल ज्यूस | | |
| (४) | मिल्कशेक | | |
| (५) | लिची शेक | | |
| (६) | बदाम शेक | | |
| (७) | चॉकलेट शेक | | |
| (८) | मँगो शेक | | |
| (९) | पायनॅपल शेक | | |
| (१०) | स्ट्रॉबेरी शेक | | |
| (११) | बटर स्कॉच शेक | | |
| (१२) | अंजीर शेक | | |
| (१३) | काजू-अंजीर शेक | | |
| (१४) | ऐंक्सप्रेसो कॉफी | | |
| (१५) | ऊसाचा रस (गन्ने का ज्यूस) | | |

**दरपत्रकादाराची सही व शिक्का**